
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# शिवाजी विद्यापीठात अभिवादन कार्यक्रम

**कोल्हापूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन कार्यक्रम झाला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, शरण साहित्य अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी, अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. प्रकाश मुंज, डॉ. संतोष कोळेकर, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात बसवेश्वर, तुकडोजी महाराजांना अभिवादन

**कोल्हापूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तृप्ती करेकट्टी, अभिषेक मिठारी, डॉ. शशीभूषण महाडीक, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. प्रकाश मुंज, डॉ. संतोष कोळेकर, सुरेश बंडगर आदी उपस्थित होते.

01 MAY 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाण्याचा सुयोग्य वापर आवश्यक

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर; जलव्यवस्थापन कृती पंधरवडा समारोप

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : जिल्ह्याला पाण्याचे महत्त्व पटवून देण्याची गरज नसली, तरीही विदर्भ आणि मराठवाड्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातही पाण्याचा सुयोग्य वापर व नियोजन आवश्यक आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. जलसंपदा विभागांतर्गत कोल्हापूर पाटबंधारे विभाग आयोजित जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ च्या समारोप कार्यक्रमात बोलत ते होते. ते या कार्यक्रमात ऑनलाईन सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, 'जिल्ह्यात मागील दहा वर्षांत अनेक धरणांची कामे पूर्ण झाली आहेत. लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नातून १० टीएमसी पाणी साठविणे शक्य झाले, हे मोठे यश आहे. आता पाणी बचतीसाठी ठिबक आणि तुषार सिंचनाचा अधिक वापर व्हायला हवा. याबाबत व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे. राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राबवलेल्या जलसाक्षरता पंधरवड्यामुळे पाण्याचे महत्त्व आणि शेतीसाठी योग्य नियोजन यावर भर देण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यात पाणी बचत, ताळेबंद आणि ठिबक सिंचनासारख्या उपक्रमांद्वारे जनजागृती करण्यात आली. जलसंपदा विभागाने आता पाण्याचे समन्यायी वाटप, पूरनियंत्रण आणि पाणी केवळ अडवणे नव्हे, तर त्याचा सुयोग्य वापर सुनिश्चित करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात.'



कोल्हापूर : जलसंपदा विभागाच्या पाणी व्यवस्थापन कृती आराखड्याचा समारोप सोमवारी (ता.३०) झाला. यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर ऑनलाईन उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, डॉ. व्ही. एम. शिंदे, अभिजित म्हेत्रे, शक्ती कदम, संजय पाटील, रोहित बांदिवडेकर, देवाप्पा शिंदे, स्मिता माने, अशोक पवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उपविभागीय उपअभियंते व अभियंत्यांना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवले.

प्रमुख वक्ते डॉ. व्ही. एन. शिंदे, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता अभिजित म्हेत्रे, उपजिल्हाधिकारी शक्ती कदम, कार्यकारी अभियंते संजय पाटील, रोहित बांदिवडेकर, देवाप्पा शिंदे, स्मिता माने, अशोक पवार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2025
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल–२०२४–२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी बी.ए., बी.कॉम., बीएसस्सी, बीसीए, बीलिप, बीएड्, बीएबीएड, एमलिप, बीबीए, एमबीए, बॅचलर ऑफ एमएस्सी, एम.एसडब्लू आदी ११२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. ही परीक्षा १८४ परीक्षा केंद्रावर ४४ हजार ७४४ विद्यार्थ्यांनी दिली. भरारी पथकाकडून सांगलीत १४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे केली आहे. विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधिन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.